महाराष्ट्र शासन
अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद यांचे कार्यालय
गृह निर्माण भवन जवळ, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद- ४३१००१.
दुरध्वनी /फॅक्स क्र. ०४०-२३३१०६०
E-mail 1) stateexciseabd@sancharnet.in (2) stateexciseabd@dataone.in

प्रति,
सर्व प्रभारी अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क
बीआरएल घटक वाळूज औरंगाबाद
ता.जि. औरंगाबाद (मे.स्कोल ब्रेवरीज लि.)

क्रमांक-बीआरएल/११०५/१८२६ औरंगाबाद दि. .४.२००६.

विषय :- बियरचे निर्यात परवाने मंजूर करण्याबाबत.

मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक डिवायएस/११९२/६९४१४/२०४/चार/५ब दिनांक ७.२.२००३ नुसार महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम १९६३ चे नियम २३ व २४ अन्वये सर्व प्रकारचे विदेशी मद्य निर्यात करतांना घटकाने H" Form मध्ये Bond देणे आवश्यक आहे. घटकाने असे Bond जिल्हाधिकारी किंवा संबंधित अधिक्षक यांचेकडे Execute केल्यावर यापुढे घटकांचे प्रभारी अधिकारी निर्यात पास देण्यास सक्षम असल्याचे घोषित केलेले आहे. सबब या कार्यालयाच्या दैनंदिनी कामाकाजतील वाढ, व महसुलाचे दिलेले उदिष्टे वेळोवेळी पूर्ण करण्यासाठी या कार्यालयाचे अधिकाराचे विकेंद्रीकरण कारण्यात येत असून दिनांक १.४.२००६ पासुन घटकांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना बियर निर्यात पास मंजूर खालील अटीच्या अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

१)- घटकाने निर्यात परवाना मंजुरीसाठी विहीत नमुन्यातील "जी" फार्म" एच" फार्म मध्यें बान्ड, आयात परवान्याची प्रती निर्यात शुल्क भरणा करुन सादर करणे आवश्यक आहे.

२) आयात परवान्याची सत्यता पडताळणी संबंधीत प्राधिकरणाकडून करुन घेऊन निर्यात परवाना मंजूर करणे बंधनकारक राहील.

३) निर्यात परवाने मंजूर केल्यानंतर संबंधित निर्यात परवान्याचे "एच" फार्म मधील बान्डवर निर्यात परवाना क्रमांक दर्शवुन दुसऱ्या दिवशी सकाळी अधिक्षककार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) निर्यात परवान्याच्या ईव्हीसी विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास उत्पादनशुल्कांची रक्कम घटकांच्या करंट ॲकाऊन्ट मधुन समायोजित करण्यात यावी. व ज्यावेळी प्राप्त घटकाच्या करंट ॲकॉऊन्ट मधुन समायोजित करण्यात यावी. व ज्यावेळी ईव्हिसी प्राप्त त्यादिवशी घटकाच्या करंट ॲकाऊन्टमध्ये समायोजित केलेली रक्कम जमा करण्यात यावी.

५) निर्यात परवान्याची मुदत स्थाई आदेशानुसार निर्यात परवाना मंजूर केलेली दिनांक वगळता २५० किलोमिटर प्रतिदिन याप्रमाणे देण्यात यावा. (आयात परवान्याची विधीग्राहयतेचे अधिन राहुन)

६) निर्यात परवाने मंजूर करावयाची नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक राहील.

७) निर्यात परवान्याचा भाग एक त्यांच्या अभिलेखावर ठेवण्यात यावा. भाग दोन - आयात परवाना मंजूर करणाऱ्या प्राधिकरणास डाक नोंद पोच देये पाठविणे बंधनकारक राहील.

२४६

८) निर्यात परवान्याची नोंदवही दरमहा उपअधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क औरंगाबाद (मुख्यालय) यांचेकडून तपासणी करुन घेणे बंधनकारक राहील.

९) निर्यात परवाने मंजूरीसाठी आवश्यक असणारे रबरी शिक्के, शिल इत्यादि उप अधिक्षक यांचेशी चर्चाकरुन तयार करुन घेऊन वापर करण्यात यावा.

स्वाक्षरीत/-
(व्ही.जी. इंदिसे)
अधिक्षक
राज्य उत्पादन शुल्क औरंगाबाद

प्रत -१) उपअधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद (मुख्यालय) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
२) सर्व बीआरएल घटक, वाळुज औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.